Inq. No: 2340/11
Mah. No. 1269/11

[विशेष--व. भा. (मुं. सा. वि.) २-म.

सत्यमेव जयते

40

31

A.C.C.-1

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव "मोरे एज्युकेशन सोसायटी" अष्टविनायक चौक, सर्वे नं 1334, अंगणवाडी रोड, मोरे वस्ती, चिखली, हवेली, पुणे

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F-31846

श्री मंगेश रामहरी मोरे यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 18/09/2011 रोजी माझ्या सहीनिशी दिले.
19/03

शिक्का

Deputy Charity Commissioner * Pune *

सही

पदनाम धर्मादाय उप आयुक्त
पुणे विभाग, पुणे

D. More

Shrimati Housabai Narayan More School
U-dise-27252000524

एफ 31846

[विशेष-घ. आ. (मुं. मा. वि.) ५०-म.

№ 043800

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक : महा./269/2011/पुणे.
दि.26/07/11/पुणे.

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, मोरे एज्युकेशन सोसायटी अष्टविनायक चौक, गट नं. १३३८, मोरे वस्ती, मु. पो. चिखली ता. हवेली जि. पुणे.

खालील तारखेस, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली. अर्जदार- मंगेश रामहरी मोरे.

तारीख : 26/07/2011 २० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

Asstt. Registrar of Society
Pune Region, Pune

26.07.2011

संस्थांचे सहायक निबंधक
निबंधक

Shrimati Housabai Narayan More School
U-dise-27252000524

महा. 9266/2011/पुणे.
दि. 29/06/11/पुणे.

(9)

:: परिशिष्ट क ::

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | **मोरे एज्युकेशन सोसायटी** |
| संस्थेचा पत्ता | : | अष्टविनायक चौक, गट नं. १३३४, अंगणवाडी रोड, १४, मोरे वस्ती, मु.पो.चिखली, ता.हवेली जि.पुणे |
| संस्थेचे कार्यक्षेत्र | : | पुणे जिल्हा व संपूर्ण महाराष्ट्र राज्य. |
| संस्थेचे ध्येय्य व उद्दिष्टे | : | विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळवून देणे, सुशिक्षीत बरोजगार तरूणांना उद्योगधंद्या संदर्भात मार्गदर्शन शिबीरे आयोजित करणे, क्रिडा, साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रम भरवणे व तसेच संस्था स्थापन करणे, नवीन शिक्षण शाखा उभारणे. |

१) **संदर्भीय शब्दांची व्याख्या :**

अ) **संस्था** : संस्था म्हणजे मु.सा.वि. सन १८६० अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था.

ब) **नियम व नियमावली** : मु.सा.वि.व्य. महाराष्ट्र सन १८६० अन्वये नोंदविण्यात येणारी व नंतर वेळोवेळी संस्थेच्या कार्यकारी मंडळाने तयार केलेली नियम व नियमावली.

क) **कार्यकारी मंडळ** : संस्थेच्या ज्ञापन व नियमावलीनुसार संस्था स्थापनेच्या वेळी नंतर संस्थेच्या ज्ञापन सर्व साधारण सभेत निवडून येणारे मंडळ की ज्यांचेवर संस्थेची व्यवस्था व जबाबदारी सोपविली आहे. असे मंडळ अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, खजिनदार, सरचिटणीस व आवश्यक असल्यास इतर पदे प्रामुख्याने असतील.

| | | |
|---|---|---|
| श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) | सौ.तृप्ती गणेश मोरे (सचिव) |



For MORE EDUCATION SOCIETY
President

(२)

ड) **सभासद** : संस्थेचे नियम व नियमावली मान्य असणारी कार्यकारी मंडळात प्रवेश दिलेली नियमितपणे वर्गणी भरणारी व्यक्ती संस्थेची सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

इ) **उद्देश** : ज्ञापनपत्रात नमुद केलेले उद्देश की ज्या करता संस्था स्थापन करण्यात येत आहे असे उद्देश.

२) **हिशोबाचे वर्ष** :

संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

३) **सभासदत्तव व त्यांची नोंदणीची पद्धत** :

संस्थेचे नियम व नियमावली मान्य असणारी व सामाजिक कार्याची आवड असलेली कोणत्याही सज्ञान व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल. परंतु सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने संस्थेकडे तसा अर्ज दोन सभासदांच्या शिफारशीसह व प्रवेश फी सह कार्यकारी मंडळाकडे पाठविला पाहिजे. त्यास मंजुरी मिळाल्यानंतरच अर्जदार व्यक्तीस सभासदत्त्वाचे अधिकार प्राप्त होतील.

४) **सभासदाचे प्रकार** :

अ) संस्थापक सभासद
ब) वर्गणीदार सभासद
क) आजीव सभासद
ड) देणगीदार किंवा आश्रयदाते सभासद
इ) सन्माननीय सभासद

अ. **संस्थापक सभासद** :

संस्था स्थापनेच्या वेळी संस्थेच्या ध्येय धोरणाने प्रेरित होऊन संस्थेच्या मुळ ज्ञापनावर सही करणारे सभासद हे संस्थेचे आजीव व सन्माननीय सभासदही असतील. संस्थापक सभासद यांचेकडून कमीतकमी रु. ७००/- [illegible] वर्गणी घेतली जाईल.

श्री. मंगेश रामहरी मोरे
(अध्यक्ष)

श्री. गणेश रामहरी मोरे
(उपाध्यक्ष)

सौ. तृप्ती गणेश मोरे
(सचिव)

For MORE EDUCATION SOCIETY
President

Charity Commissioner, Andheri, Pune

③

ब. **वर्गणीदार सभासद :**

संस्थेच्या कार्यकारी मंडळाने प्रवेश दिलेली व संस्था ठरवून दिल्याप्रमाणे नियमितपणे वार्षिक वर्गणी रूपये १००/— भरणारे सभासद.

क. **आजीव सभासद :**

जी व्यक्ती एकदम १०१/- रूपये वर्गणी देईल त्या व्यक्तीस आजीव सभासदत्व बहाल करण्यात येईल.

ड. **देणगीदार किंवा आश्रयदोत सभासद :**

संस्थेला देणगी रूपाने, वस्तुरूपाने आर्थिक वा अन्य प्रकारे सहाय्य करणाऱ्या व्यक्तीस देणगीदार किंवा आश्रयदाते सभासद म्हणून संबोधण्यात येईल. परंतु अशा सभासदांना निवडणुकीत मतदानाचा अधिकार राहणार नाही.

इ. **सन्माननीय सभासद :**

समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिष्ठीत व्यक्तीस संस्थेचे सन्माननीय सभासदत्व बहाल करण्यात येईल.

५) **सभासदांचे हक्क :**

१. वरीलपैकी सर्व सभासदांना संस्थेच्या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून चर्चा करण्याचा व मतदानाचा हक्क राहील व संस्थेच्या वेळोवेळी होणाऱ्या या कार्यक्रमामध्ये सहभागी होता येईल तसेच लेखी सुचना व दाद मागण्याचा अधिकार राहील.

२. सभासदांनी आपली वर्गणी एक वर्षाच्या आत पूर्ण भरल्यास त्यांना मतदानाचा हक्क राहील.

३. संस्थेच्या सभासदांना कमीत कमी ३/४ त्यापेक्षा जास्त सभासदांना संस्थेने तातडीची सभा बोलाविण्याचा अधिकार राहील

श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) | सौ.तृप्ती गणेश मोरे (सचिव)

For MORE EDUCATION SOCIETY

President

(४)

४. संस्थेच्या वेळोवेळी होणाऱ्या सभांच्या सूचना व वार्षिक अहवाल मिळण्याचा हक्क राहील.

५. संस्थेचा जमा-खर्च व इतर माहिती विचारण्याचा हक्क राहील.

६) **सभासदांची कर्तव्ये :**

१. संस्थेच्या प्रत्येक सभेला उपस्थित रहावे.

२. संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.

३. संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करणे व पदाधिकाऱ्यांना सहकार्य करणे.

४. सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होते किंवा नाही ते पहाणे.

५. संस्थेच्या विकासाकरीता निधी उभारण्यास मदत करणे.

६. संस्थेच्या विविध कार्यक्रमामध्ये सक्रिय सहकार्य करणे.

७) **सभासदत्त्व रद्द होणे :**

अ) संस्थेच्या एखाद्या सभासदाने राजीनामा दिल्यावर तो कार्यकारी मंडळाने स्विकारल्यास सभासदत्त्व रद्द होईल.

ब) एखाद्या सभासदाचा मृत्यु झाल्यास.

क) संस्थेच्या हितास बाधक असे कृत्य केल्यास त्या सभासदास सदर कृत्याबद्दल खुलासा करण्याची संधी देऊन त्याचे सभासदत्त्व रद्द करण्याचा ठराव कार्यकारी मंडळाने मांडून नंतरच सभासदत्त्व रद्द करण्यात येईल.

८) **सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कार्य :**

संस्थेचे सर्व सभासद सर्वसाधारण सभेचे सभासद राहतील. सर्वसाधारण सभा वर्षातून एकदा कमीत कमी एक वेळ घेतली जाईल. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ही संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून बारा महिन्याच्या आत बोलावयाचे बंधन कार्यकारी मंडळावर राहील.

| श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) | सौ. तृप्ती गणेश मोरे (सचिव) |
|---|---|---|

MORE EDUCATION SOCIETY
President

(५)

कोणत्याही परिस्थितीत आर्थिक वर्ष संपल्यानंतर चार महिन्याच्या आत कार्यकारी मंडळाने वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावली नाही तर १/३ सभासदांनी एकत्र येऊन अशी सभा घेणे, बदल करणे व योग्य तो निर्णय घेऊ शकतील आणि त्यानुसार होणाऱ्या या सभेतील ठराव मंडळावर बंधनकारक राहतील. मागील सभेचा वृत्तांत कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमा, खर्च, ताळेबंद अहवाल वाचून दाखवणे, व त्याच्या प्रती प्रत्येक सभासदास देणे, पुढील वर्षासाठी अंदाज पत्रक तयार करणे, कार्यकारी मंडळाची निवड करणे, व निवडणुकीचे निकाल जाहीर करणे, पुढील वर्षासाठी चार्टर्ड अकाऊंटंट अगर पब्लिक ट्रस्ट ऑडिटर नेमणे, नियम व नियमावलीत दुरूस्त्या असल्यास त्याला मान्यता देणे, उद्देश पुर्तीसाठी धोरणानुसार निर्णय घेणे व चर्चा करणे, अध्यक्षांच्या परवानगीने येणारी इतर सभासदांनी अगोदर नोटीस देऊन सभेपुढे आणलेली कामे करणे.

९) **सर्व साधारण सभेची सुचना व गणसंख्या :**

कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी व वेळी सरचिटणीस / कार्याध्यक्षांच्या सहीने परिपत्र काढून सर्वसाधारण सभा बोलवणे, परिपत्रकामध्ये स्थळ व सभेची तारीख यांचा उल्लेख असेल तर असे परिपत्रक प्रत्येक सभासदाला सभेच्या आधी सात दिवस मिळेल अशी व्यवस्था असेल.

१०) **गणसंख्या :**

सर्वसाधारण सभेसाठी २/३ गणसंख्या आवश्यक आहे. गणसंख्येच्या अभावी तहकुब झालेली सभा त्या सभेच्या अध्यक्षांच्या परवानगीनुसार त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेत गणसंख्येची गरज भासणार नाही. सभेपुर्वी कार्यक्रमपत्रिका राहील व या सभेने घेतलेले निर्णय कायदेशीर समजले जाईल.

For MORE EDUCATION SOCIETY

President

| श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) | सौ. तृप्ती गणेश मोरे (सचिव) |
|---|---|---|

११) **निवडणुक :**

संस्थेच्या सभासद मतदाराची यादी तयार करण्यात येईल व सभासदातून प्रत्येक पाच वर्षांनी कार्यकारी मंडळाची निवड सर्वसाधारण सभा करेल, कार्यकारी मंडळावर निवडुन आलेले सभासद, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सरचिटणीस, खजिनदार, याची निवड करतील निवडणुका ठरविण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. निवडणुक होणेपुर्वी एक महिना अगोदर सभासदांची नावे संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केली जातील. ज्या सभासदांनी आपली १०१ वर्गणीची रक्कम पूर्ण भरलेली आहे अशाच सभासदांना पात्र समजले जाईल. कार्यकारी मंडळाची निवडणुक ही लोकशाही पद्धतीने पार पाडली जाईल.

१२) **पदाधिकारी :**

१. संस्थेचा एक अध्यक्ष राहील.

२. संस्थेचे एक उपाध्यक्ष राहील.

३. संस्थेचा एक सचिव राहील.

४. संस्थेचा एक खजिनदार राहील.

५. संस्थेचा एक सल्लागर राहील.

६. सस्थेत इतर सहा सभासद राहतील.

१३) **कार्यकारी मंडळ :**

संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, सल्लागार कार्यकारणी सभासद ह्या सर्वांचे मिळून कार्यकारी मंडळ राहील. कार्यकारी मंडळाची मुदत पाच वर्षांची राहिल. कार्यकारी मंडळावर कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १७ सभासद असतील. कार्यकारी मंडळाची आवश्यक तितक्या सभा घेण्यात येईल. कार्यकारी मंडळाचे पाच सदस्य उपस्थित असले म्हणजे गणपुर्ती होईल. कार्यकारी मंडळातील पद, राजीनामा, मृत्यु अगर अन्य

For MORE EDUCATION SOCIETY

| श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) | President<br>सौ.तृप्ती गणेश मोरे (सचिव) |
|---|---|---|

(१०)

कारणांमळे रिकामे झालेल्या जागेवर नवीन सभासद नेमून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळातील राहीलेल्या सभासदांना राहील. संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व सदस्य काम विना वेतन करतील.

१४) **कार्यकारी मंडळाची कामे :**

संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी आवश्यक ते निर्णय घेणे व आवश्यक ती कामे करणे, विविध कामाच्या वाट्यासाठी समित्या व उपसमित्या तयार करणे, संस्थेचे उपविधी तयार करणे व आवश्यकतेनुसार त्यात बदल करणे, संस्थेसाठी निधी उभारणे, देणग्या स्विकारणे, संस्थेच्या उद्देशाकरीता जागा खरेदी करणे किंवा भाड्याने घेणे, इमारंत बांधणे व संस्थेच्या उद्देशासाठी निधीचा विनीयोग करणे, सभा भरविणे व सभेचा वृत्तांत ठेवणे, नवीन सभासदांच्या अर्जावर विचार करून सभासदत्त्व देणे.

१५) **पदाधिकाऱ्यांची कामे :**

**अध्यक्ष :** संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी निधी संकलीत करणे, संस्थेच्या संपूर्ण कामात मदत करणे.

**उपाध्यक्ष :** अध्यक्षाचे गैरहजेरीत काम करणे.

**कार्याध्यक्ष :** कार्यकारी मंडळाचा प्रमुख म्हणून कार्य करणे, संस्थेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, कार्यकारी मंडळाची सभा बोलावणे व तिचे कामकाज चालविणे, कार्यकारी मंडळाच्या मंजुरीचा योग्य तो खर्च करणे, संस्थेच्या उद्देश पुर्तीसाठी निधी संकलीत करणे, संस्थेचे बँक खाते चालविणे, संस्थेच्या निधीचा हिशोब अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न करणे.

For MORE EDUCATION SOCIETY

President

| श्री. मंगेश रामहरी मोरे | श्री. गणेश रामहरी मोरे | सौ.तृप्ती गणेश मोरे |
|---|---|---|
| (अध्यक्ष) | (उपाध्यक्ष) | (सचिव) |

**खजिनदार** : संस्थेच्या निधी जमविण्यासाठी प्रयत्न कणे, मंडळाचे बँक खाते चालविणे, संस्थेच्या निधीचा हिशोब अद्ययावत ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, संस्थेचे आर्थिक व्यवहार सांभाळणे. दरवर्षी मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे ऑडिट रिपोर्ट दाखल करणे.

**सचिव** : संस्थेचे कागदपत्र सांभाळणे, अध्यक्षांच्या सहाय्याने सभा घेण्याचे ठरवून त्याचप्रमाणे सभासदांना सभेची सुचना देणे, संस्थेच्या परिपत्राकवर सह्या करणे, संस्थेच्या सभेचे वृत्त लिहीणे, बँक खाते चालविणे, कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना आवश्यक ती माहिती पुरविणे.

**सदस्य** : सभांना वेळोवेळी हजर राहणे, संस्थेच्या कामात सुचना, हरकती मते मांडून चर्चा करणे व इतर पदाधिकारी यांना त्यांच्या कामात मदत करणे.

१६) **विषेश सर्वसाधारण सभा व मागणीची सभा :**

कार्यकारी मंडळाची सभा ही वर्षातून ४ वेळा बोलावण्यात येईल व आवश्यक वाटल्यास जादा सभा बोलावयाचा अधिकार अध्यक्षांना / कार्याध्यक्षांना राहील. अशा सभेची नोटीस सभेपुर्वी किमान सात दिवस अगोदर अध्यक्षांच्या / कार्यालध्यक्षांच्या संमतीने सभेची तारीख वेळ व सभेचे ठिकाण इत्यादी बाबींचा उल्लेख असलेली नोटीस संस्थेच्या सेवकामार्फत किंवा टपांलाने कार्यकारी मंडळाच्या सभासदांना पाठविण्यात येईल. कार्यकारी मंडळ १७ सभासदांचे असून किमान ७ जणांची गणसंख्या राहील. सभेस गणसंख्या न झाल्यास अर्धा तास सभा तहकुब करून त्याच ठिकाणी पुन्हा अर्धा तासाने सभा सुरू करण्यात येईल व अशा सभेस गणपुर्ती आवशयक राहणार नाही.

१७) **विशेष सर्वसाधारण सभा :**

कार्यकारी मंडळास सर्व सभासदांपुढे एखादी महत्त्वाची गोष्ट ठेवायची असल्यास अगर एखादा विशेष प्रश्नी सर्वसाधारण सभा

For MORE EDUCATION SOCIETY
President

| | | |
|---|---|---|
| श्री. मंगेश रामहरी मोरे<br>(अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे<br>(उपाध्यक्ष) | सौ.तृप्ती गणेश मोरे<br>(सचिव) |

घेता येईल. त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळले जातील. तसेच पटावरील २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी / कार्याध्यक्षांनी बोलावली पाहिजे.

१८) **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :**

कार्यकारी मंडळातील रिक्त पद मृत्यु, राजीनामा अगर अन्य कारणाने रिकामे झाल्यास अशा रिक्त झालेल्या जागी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड कार्यकारी मंडळातील उरलेल्या सभासदांना करता येईल. मात्र सहा महिन्याच्या आत असे रिक्त पद न भरल्यास मा. धर्मादाय सह. आयुक्त, पुणे यांचे कार्यालयाकडून योग्य मार्गदर्शन घेऊन नवीन पदाधिकाऱ्यांची नेमणुक करण्याचा अधिकार संस्थेच्या व्यवस्थापकीय मंडळास राहील.

१९) **संस्थेचा निधी :**

संस्थेचा उद्देश साध्य करण्यासाठी देणगी, शासकीय अनुदान व सभासद वर्गणी याद्वारे निधी संस्थेस जाईल.

२०) **उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद :**

संस्थेच्या उद्देशपुर्ततेसाठी व संस्थेच्या एकूण उत्पन्नातून उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद पुढीलप्रमाणे राहील.

ज्ञापनातील उद्दीष्टांसाठी : ~~७५%~~ 80 %.

व्यवस्थापकीय उद्दीष्टांसाठी : ~~२५%~~ 20 %.

२१) **संस्थेचा निधी मिळकत व विनियोग :**

संस्थेचा उद्देशपुर्ततेसाठी सभासद वर्गणी, देणग्या खाजगी व्यक्तींकडून तसेच शासकीय, निमशासकीय अनुदाने करमणुकीच्या साधनाद्वारे मिळणारे उत्पन्न, बक्षीस ह्या सर्व

For MORE EDUCATION SOCIETY

President

श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) | सौ.तृप्ती गणेश मोरे (सचिव)

(१०)

रक्कमा हा संस्थेचा निधी समजण्यात येईल. तसेच देणगी रूपाने करार, खरेदी व अन्य मार्गाने मिळणारी स्थावर व जगम मालमत्ता संस्थेची मिळकत समजण्यात येईल.

वरील मार्गाने मिळणारी रक्कम संस्थेच्या उद्देशपुर्ततेसाठी व संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा पगार व इतर दैनंदिन गरजेसाठी वापरली जाईल. तसेच संस्थेच्या सभासदांनी जर संस्थेच्या उद्दीष्ट पुर्तीसाठी व्यवसायीक रूपाची मदत केली तर मोबदला दिला जाईल परंतु संस्थेच्या उत्पन्नातील फायदा सभासदांना मिळणार नाही.

२२) **संस्थेचे बँक खाते :**

संस्थेचा सर्व निधी राष्ट्रीय बँकेत अथवा सहकारी बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडून ठेवला जाईल व हे खाते अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सरचिटणीस व खजिनदार या चौघांपैकी कोणाही दोघांच्या संयुक्त सहीने चालविले जाईल.

२३) **कर्ज किंवा ठेवी यासंबंधीची तरतुद:**

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. त्यापुर्वी मु.सा.वि.व्यं. १९५० चे कलम ३५ व ३६ प्रमाणे मा. धर्मादाय सह. आयुक्त पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल. तसेच ठेवी स्विकारता येईल.

२४) **स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री करणे संबंधीची तरतुद :**

संस्थेत कायदेशीर योग्य वाटल्यास स्थावर मिळकत खरेदी करता येईल तसेच संस्थेची स्थावर मालमत्ता विकता येईल. त्याबाबतचा संपूर्ण अधिकार कार्यकारी मंडळावर राहील. परंतु त्यासाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळाला मु.सा.वि.व्य. १९५० चे कलम ३५ व ३६ प्रमाणे पुर्तता करून मे. धर्मादाय सह. आयुक्त पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल.

For MORE EDUCATION SOCIETY

President

| | | |
|---|---|---|
| श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) | सौ.तृप्ती गणेश मोरे (सचिव) |

(१९)

२५) **नियम व नियमावलीमध्ये बदल करण्याची तरतुद :**

कार्यकारी मंडळाने किंवा बहुसंख्य सभासदाने संस्थेच्या चालू नियम व नियमावलीमध्ये बदल किंवा दरूस्ती सुचविली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या २/३ बहुमताने असा ठराव मांडून मंजूर करण्यात येईल. मात्र घटना दुरूस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसीबरोबर पाठविला पाहिजे.

२६) **नांव अथवा उद्देशातील बदल :**

संस्थेचे नाव अथवा उद्देश यात बदल करावयाचा असेल अथवा दोन संस्थाचे विलीनिकरण करायचे असेल तर सन १८६० चे संस्था नोंदणी कायद्यातील कलम १२ अथवा १२(अ) यातील असणारया तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

२७) **सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :**

सभासदांची यादी सन १९७१ च्या संस्था नोंदणी नियम १५अ नुसार अनुसूची ६ चे नमुन्यात ठेवण्यात येईल.

२८) **संस्थेचे विसर्जन :**

संस्थेचे विसर्जन करावयाचे झाल्यास ३/४ सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल व संस्था नोंदणी सन १८६० चे अधिनियमातील कलम नं. १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही करण्यात येईल.

For MORE EDUCATION SOCIETY

President

श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे | सौ.तृप्ती गणेश मोरे

(१२)

:: **दाखला** ::

असे प्रमाणित करण्यात येते की, " **मोरे एज्युकेशन सोसायटी** " या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही सत्य व खरी प्रत आहे.

**स्थळ : पुणे.**

**दिनांक :** १०.६.९९

शिक्क्याची खरी नक्कल

५/८/११

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे

For MORE EDUCATION SOCIETY

President

| श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) | श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) | सौ. तृप्ती गणेश मोरे (सचिव) |
|---|---|---|

(५)

:: **प्रमाणपत्र** ::

यावरून असे प्रमाणित करण्यात येते की, आमचे उत्तम माहिती व समजुतीप्रमाणे " **मोरे एज्युकेशन सोसायटी** " या नावाची अथवा नावात साम्य असणारी दुसरी संस्था अथवा प्रतिष्ठान आमच्या भागात व परिसरात अस्तित्त्वात नाही. अथवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था नोंदविण्यात आलेली नाही.

**स्थळ : पुणे.**
**दिनांक :** १०.६.११

सही

For MORE EDUCATION SOCIETY
President

श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष)

श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष)

सौ.तृप्ती गणेश मोरे (सचिव)

(६)

(१)

महा. ९२६८/2011/पुणे.
दि. २६/०६/११/पुणे.

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

परिशिष्ट ब
संस्थेचे ज्ञापन

संस्थेचे नाव :- ' मोरे एज्युकेशन सोसायटी '

संस्थेचा पत्ता :- अष्टविनायक चौक, गट नं. १३३४, ~~अंगणवाडी रोड, १४,~~ मोरे वस्ती, मु.पो. चिखली, ता. हवेली, जिल्हा - पुणे

संस्थेचे कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य

संस्थेचे ध्येय :- आपला देश सुशिक्षित, सुसंपन्न , सुसंस्कृत बनवायचा असेल तर आधी समाजातील प्रत्येक घटक हा साक्षर बनला पाहीजे. शिक्षणामुळे माणसांमध्ये अमुलाग्र बदल होत असतो. समाजातील कोणताही घटक शिक्षणापासुन वंचित राहू नये म्हणुन सरकार शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर खर्च करीत असते व समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी अनेक प्रकारच्या योजना राबवित असतो. सरकारच्या या ध्येय धोरणांनी प्रेरित होवून आम्ही ' मोरे एज्युकेशन सोसायटी ' या नावाची संस्था स्थापन करू इच्छितो व सदरहू संस्थेमार्फत पुढील उद्देश राबवू इच्छितात.

संस्थेचे उद्देश :-

१. संस्थेच्या कार्यक्षेत्रात साक्षरता प्रसार व प्रचार केला जाईल . शाळातील विद्यार्थी , विद्यार्थीनींची गळती थांबविण्याचा प्रयत्न केला जाईल.

२. संस्थेच्या संपुर्ण कार्यक्षेत्रात गरज व आवश्यकता असेल त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने मराठी तसेच इंग्रजी माध्यमातून बालवाडीपासुन ते महाविद्यालयापर्यंत सर्वप्रकारच्या शिक्षण संस्था सुरु करणे उदा:- बालवाडया, अंगणवाडया, आश्रमशाळा सुरु करणे. तंत्रशाळा ( टेक्नीकल ट्रेनिंग ) कन्याशाळा, आश्रमशाळा, सैनिकीशाळा मतीमंद शाळा , यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाचे अभ्यासकेंद्र सुरु करणे.

३. तसेच प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालये, डी.एड., बी. एड. कॉलेजेस तंत्रशाळा, मेडिकल कॉलेजेस्, सर्व फॅकल्टीजमधील इंजिनिअरींग कॉलेजेस् , ॲग्रीकल्चर कॉलेजेस् सुरु करणे इ. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील विविध शैक्षणिक संस्था सुरु करुन शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे

४. मुक बधिर , अंध, अपंगांसाठी शैक्षणिक संस्था सुरु करणे, संगणक प्रशिक्षणवर्ग, निरनिराळया स्पर्धापरीक्षांचे व पुर्वपरिक्षांचे आयोजन करणे, स्पर्धापरीक्षा व पुर्वपरिक्षांसाठी व्याख्याने , चर्चासत्रे, परिसंवाद, मार्गदर्शनपर शिबीरे आयोजित करणे.

५. विद्यार्थांकरिता वसतिगृह सुरु करणे, बोर्डींग सुरु करणे, सुसज्ज अशी अभ्यासिका, वाचनालये, ग्रंथालये सुरु करणे, संस्थेतर्फे गरीब व होतकरु विद्यार्थांना सर्वप्रकारची शैक्षणिक मदत करणे, उदा:- त्याना शिष्यवृत्त्या देणे, शैक्षणिक कर्ज, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे, हुशार व गुणवंत विद्यार्थांचा गौरव करणे.

६. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शारिरीक विकासाबरोबर त्यांचे विशेष छंद जोपासण्याकरिता विविध कलावर्ग उदा:- संगीत, वादन, अभिनयक्षेत्रात प्रशिक्षित शिक्षकांकडुन त्यांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शन करणे , व्यक्तीमत्व विकास शिबीरे आयोजित करणे, हुशार व होतकरु विद्यार्थांना परदेशात शिक्षणासाठी जाण्याची संधी उपलब्ध करुन देणे व त्यासाठी मार्गदर्शन व आवश्यक ती मदत करणे.

| श्री मंगेश रामहरी मोरे | श्री. गणेश रामहरी मोरे | सौ. तृप्ती गणेश मोरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

For MORE EDUCATION SOCIETY

President

७) आश्रमशाळा, तंत्रशिक्षण संस्था, अनाथालय, बालकाश्रम, वृद्धाश्रम, विधवालय, महिलाश्रम, पाळणागृहे, शिलाईगृहे स्थापन करणे.

८) नवीन शिक्षण शाखा उभारणे.

९) मुलांना राहण्यासाठी होस्टेल उभारणे, प्राथमिक आरोग्य उपचार मिळवुन देणे.

**सामाजिक कार्य :**

हुंडाबंदी, दारुबंदी, व्यसनमुक्ती आंदोलने, योगासन शिबीर, अंधश्रृद्धा निर्मुर्लन आयोजित करुन समाज प्रबोधन करणे तसेच सामाजिक वनीकरण, वृक्षारोपण साक्षरता प्रसार इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करणे.

समाजाच्या आर्थिक विकासासाठी जनतेमध्ये शेती विकास, सांस्कृतिक विकास, शिक्षण व प्रशिक्षण संशोधन इत्यादीसाठी मेळावे आयोजित करणे, तसेच सामाजिक व विधायक कार्यक्रमांचे संस्थेमार्फत आयोजन करणे.

सदरहु '' **मोरे एज्युकेशन सोसायटी** '' या संस्थेचे नियम व नियमावली प्रमाणे ज्या पहिल्या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपवली आहे. अशा कार्यकारी मंडळातील पहिल्या सभासदाची नांवे, वय, व्यवंसाय व संस्थेमधील पदे पुढीलप्रमाणे राहतील.

| क्र. | सभासदाचे नांव | वय | व्यवसाय | पद | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.मंगेश रामहरी मोरे | २७ | व्यवसाय | अध्यक्ष | मु.पो.चिखली मोरेवस्ती, ता.हवेली जि.पुणे |
| २. | श्री.गणेश रामहरी मोरे | २९ | व्यवसाय | उपाध्यक्ष | सदर |
| ३. | सौ.तृप्ती गणेश मोरे | २६ | नोकरी | सचिव | सदर |
| ४. | सौ.अनुराधा मंगेश मोरे | २३ | नोकरी | खजिनदार | सदर |
| ५. | श्री.रामहरी नारायण मोरे | ५५ | शेती | सल्लागार | सदर |
| ६. | सौ.शकुंतला रामहरी मोरे | ५१ | शेती | सदस्य | सदर |
| ७. | श्री.संजय शिवाजी मोरे | ४० | शेती | सदस्य | सदर |

श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष) — श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष) — सौ.तृप्ती गणेश मोरे (सचिव)

For MORE EDUCATION SOCIETY

President

③

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | श्रीरामदास काळोखे | ज्ञानोबा | | शेती | सदस्य | मु.पो.देहुगाव, झेंडेमळा ता-हवेली,पुणे. |
| ९. | श्री.तानाजी चिंचवडे | भिकोबा | ५१ | शेती | सदस्य | मु.पो.चिंचवड, चिंचवडे नगर, ता.हवेली जि.पुणे |
| १० | श्री.दिनेश मारुती तापकीर | | | शेती | सदस्य | मु.पो.चऱ्होली बु. तापकीरवाडी, ता.हवेली जि.पुणे |
| ११ | श्री.निखिल तुकाराम मोरे | | २० | शेती | सदस्य | मु.पो.चिखली मोरेवस्ती, ता.हवेली जि.पुणे |

वरील सर्व इसमांना मी ओळखत असून, त्यांनी माझे समक्ष या ज्ञापन पत्रावर सह्या केल्या आहेत, त्या मी ओळखतो.

**स्थळ : पुणे.**

**दिनांक : १०.६.९९** **स्पेशल एक्झीक्युटीव्ह मॅजीस्ट्रेट / ॲडव्होकेट**

वरील आम्हां सर्वांची " **मोरे एज्युकेशन सोसायटी** " या नावाची संस्था स्थापु इच्छितो व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदवू इच्छितो म्हणून एकत्र येऊन या ज्ञापनावर आज दिनांक १०.६.९९ रोजी सह्या करीत आहोत.

| क्र. | सभासदाचे नांव | सही |
|---|---|---|
| १. | श्री.मंगेश रामहरी मोरे | |
| २. | श्री.गणेश रामहरी मोरे | |

श्री. मंगेश रामहरी मोरे (अध्यक्ष)

श्री. गणेश रामहरी मोरे (उपाध्यक्ष)

सौ.तृप्ती गणेश मोरे (सचिव)

For MORE EDUCATION SOCIETY

President

(8)

| | | |
|---|---|---|
| ३ | सौ.तृप्ती गणेश मोरे | T.More |
| ४ | सौ.अनुराधा मंगेश मोरे | |
| ५ | श्री.रामहरी नारायण मोरे | |
| ६ | सौ.शकुंतला रामहरी मोरे | सौ शकुंतला रामहरी मोरे |
| ७ | श्री संजय शिवाजी मोरे | |
| ८ | श्री.रामदास ज्ञानोबा काळोखे | |
| ९ | श्री.तानाजी भिकोबा चिंचवडे | |
| १० | श्री.दिनेश मारुती तापकीर | |
| ११ | श्री.निखिल तुकाराम मोरे | N.More |

वरील सर्व इसमांना मी ओळखत असून त्यांनी माझे समक्ष सह्या केल्या आहेत. त्यांना मी ओळखतो.

**स्थळ : पुणे.**

**दिनांक :** १०.६.९९

सही

ॲड आनंद बा. कदम
623/12, समता नगर,
नवी सांगवी, पुणे-27

श्री. मंगेश रामहरी मोरे
(अध्यक्ष)

श्री. गणेश रामहरी मोरे
(उपाध्यक्ष)

सौ.तृप्ती गणेश मोरे
(सचिव)

For MORE EDUCATION SOCIETY

President

(५)

:: प्रमाणपत्र ::

यावरून असे प्रमाणित करण्यात येते की, आमचे उत्तम माहिती व समजुतीप्रमाणे '' **मोरे एज्युकेशन सोसायटी** '' या नावाची अथवा नावात साम्य असणारी दुसरी संस्था अथवा प्रतिष्ठान आमच्या भागात व परिसरात अस्तित्त्वात नाही. अथवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था नोंदविण्यात आलेली नाही.

स्थळ : पुणे.
दिनांक : २०.६.११

सही

| श्री. मगेश रामहरी मोरे | श्री. गणेश रामहरी मोरे | सौ.तृप्ती गणेश मोरे |
|---|---|---|
| (अध्यक्ष) | (उपाध्यक्ष) | (सचिव) |

For MORE EDUCATION SOCIETY

President